# लोकनेते मारूतरावजी घुले पाटील राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन

# वक्तृत्व स्पर्धा

सन २०२६-२७

प्रति
मा.प्राचार्य,
स.न.वि.वि.

लोकनेते मारुतरावजी घुले पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सन १९९२ मध्ये जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालयाची सुरूवात केली. त्यामागे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण उच्चशिक्षणाची सुविधा निर्माण करण्याचा उद्देश होता.

हे महाविद्यालय श्री. मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्था संचलित असून संस्थेचे अध्यक्ष मा. आ. नरेंद्रजी घुले पाटील, उपाध्यक्ष मा. आ. श्री. चंद्रशेखर घुले पाटील, मा. डॉ. क्षितीज नरेंद्रजी घुले पाटील तसेच शिक्षण संस्थेच्या विश्वस्त मंडळाच्या मार्गदर्शनाखाली वाटचाल करीत आहे. विद्यार्थ्यांनी अद्ययावत ज्ञान आणि विविध कौशल्ये आत्मसात करावी, त्यांच्यामध्ये विविध जीवनमूल्यांची जोपासना व्हावी, वैचारिक भरणपोषण आणि कलागुणांचे संवर्धन व्हावे यासाठी महाविद्यालयाने सातत्याने प्रयत्न केले आहेत. या प्रयत्नातील एक पाऊल म्हणजे 'राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजन' होय.

लोकनेते मारुतरावजी घुले पाटील यांनी ' ज्ञानेश्वरी ' तील कर्मवादाचा अंगिकार करून परिसरातील शेतकरी, कष्टकरी व समाजातील सर्व घटकांच्या उद्धारासाठी आयुष्यभर कार्य केले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात ज्ञान-भक्ती-कर्म यांचा संगम पाहावयास मिळतो. त्यांचे राजकारण, समाजकारण, सहकार, कृषी, उद्योग, शिक्षण क्षेत्रामध्ये भरीव योगदान आहे. त्यांनी सहकार चळवळीला नवी दिशा दिली. त्यांच्या या पथदर्शी कार्याचा, त्या मागील विचारांचा जागर व्हावा, त्यामधून प्रेरणा घेत कार्य उभे राहावे अशा काही उद्देशातून लोकनेते मारूतरावजी घुले पाटील यांच्या दि. १५ सप्टेंबर रोजी असणाऱ्या जयंतीच्या निमित्ताने **लोकनेते मारूतरावजी घुले पाटील राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे** आयोजन करीत असतो . या स्पर्धेसाठी आपल्या महाविद्यालयातील स्पर्धक विद्यार्थ्यांना पाठवून सहकार्य करावे, ही विनंती.

## ❊ वक्तृत्व स्पर्धेचे विषय ❊

१. हे विश्वचि माझे घर । ऐसी मती जयाचि स्थिर ।
किंबहुना चराचर । आपण जाहला ।।

२. उर्जा आणि जागतिक व्यापार

३. हवामान बदल व जल संकट

४. AI आणि कौशल्यविकास :संधी की अडथळा

## संयोजन समिती

| | |
|---|---|
| प्रा. डॉ. काकासाहेब लांडे (कार्याध्यक्ष) मो.९४२१५८६६७३ | प्रो.(डॉ.)शिरीष लांडगे प्राचार्य (अध्यक्ष) मो.९४०४९८०३२४ |
| प्रा.पांडुरंग देशमुख (सह कार्याध्यक्ष) मो.९४२१३३०२५७ | प्रा. डॉ. रमेश नवल उपप्राचार्य (सदस्य) मो.९४२०८४०४३३ |
| प्रा. मीना पोकळे (सचिव) मो.९४२३७६६३३४ | प्रो.(डॉ.)संभाजी काळे उपप्राचार्य (सदस्य) मो.९८२२३३६९२१ |
| प्रा.देविदास सोनवणे (सदस्य) मो.९९७५९१५०८३ | प्रा. केशव चेके (सदस्य) मो.९४२२२८८५९० |
| श्री. रवींद्र पाटील (सदस्य) मो.९४२३०३९१०० | प्रो.(डॉ.) अशोक सागडे (सदस्य) मो.९७३०९९५८६४ |

सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी वृंद
**जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालय,भेंडे**

## ❊ स्पर्धेचे उद्घाटन ❊

मंगळवार दि. ८ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.०० वा.

अध्यक्ष

**मा. आ. डॉ. नरेंद्रजी घुले पाटील**
(अध्यक्ष, श्री मारूतराव घुले पाटील शिक्षण संस्था, ज्ञानेश्वरनगर)

प्रमुख उपस्थिती

**मा. डॉ. क्षितिज नरेंद्रजी घुले पाटील**
(विश्वस्त, श्री मारूतराव घुले पाटील शिक्षण संस्था, ज्ञानेश्वरनगर)

**मा. प्रा. डॉ.नारायण म्हस्के**
(विश्वस्त, श्री मारूतराव घुले पाटील शिक्षण संस्था, ज्ञानेश्वरनगर)

**मा. अनिल पं. शेवाळे**
(सचिव, श्री मारूतराव घुले पाटील शिक्षण संस्था, ज्ञानेश्वरनगर)

## ❊ पारितोषिक वितरण समारंभ ❊

बुधवार दिनांक ९ सप्टेंबर २०२६ रोजी
स्पर्धा संपल्यानंतर स्पर्धेच्या ठिकाणी

❊ अध्यक्ष ❊

**मा. आ. श्री.चंद्रशेखर घुले पाटील**
(उपाध्यक्ष, श्री मारूतराव घुले पाटील शिक्षण संस्था, ज्ञानेश्वरनगर)

❊ प्रमुख उपस्थिती ❊

**मा. श्री. काकासाहेब नरवडे पा.**
(व्हा.चेअरमन, लोकनेते मारूतराव घुले पाटील ज्ञा.स.सा.का.लि.,ज्ञानेश्वरनगर)

**मा. रविंद्र एन. मोटे**
(सहसचिव, श्री मारूतराव घुले पाटील शिक्षण संस्था, ज्ञानेश्वरनगर)

## ❊ स्पर्धा ठिकाण ❊

**लोकनेते मारूतरावजी घुले पाटील बहुउद्देशीय सभागृह**
**जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालय**
ज्ञानेश्वरनगर, पो. भेंडा, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर

## ❊ पारितोषिके ❊

**प्रथम क्रमांक - रू.११,००० प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह**
**व्दितीय क्रमांक - रू.७,००० प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह**
**तृतीय क्रमांक - रू.५,००० प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह**
**उत्तेजनार्थ (दोन क्रमांक)- प्रत्येकी रू.१,०००**
**प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह**

## ❊ स्पर्धेचे नियम ❊

१) स्पर्धेचे आयोजन दि.८ व दि.९ सप्टेंबर या दोन दिवशी करण्यात आलेले आहे.
२) प्राप्त प्रवेशिकेमधून स्पर्धकांना दि.८ किंवा दि.९ सप्टेंबरला त्यांच्या सादरीकरणाचा क्रमांक ठरवुन ड्रॉ पध्दतीने कळविले जाईल.
३) स्पर्धा वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आहे. स्पर्धक हा १८ ते २५ या वयोगटातील असावा.
४) स्पर्धा फक्त मराठी भाषेतच होईल.
५) स्पर्धेसाठी ८ + २ = १० मिनिटे वेळ दिला जाईल. वेळेची मर्यादा न पाळणारा स्पर्धक बाद केला जाईल.
६) स्पर्धेसाठी येताना आपल्या महाविद्यालयाचे ओळखपत्र व स्वतःचे आधारकार्ड यांची छायांकित प्रत नोंदणी करताना जमा करावी.
७) सोबत दिलेल्या प्रवेश अर्जाची प्रिंट काढून संपूर्ण भरलेला अर्ज प्राचार्यांच्या सही शिक्क्यानिशी दिनांक ३१/०८/२०२६ पर्यंत https://forms.gle/fIWwFw5uJ841pgjy8 या लिंक वर गुगल फॉर्म भरून अपलोड करावा. तसेच येताना तो प्रवेश अर्ज बरोबर आणून नाव नोंदणी करताना स्पर्धास्थळी संयोजकाकडे जमा करावा.
८) सर्व स्पर्धकांनी स्पर्धा ठिकाणी दि.८ सप्टेंबर व दि.९ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजेपर्यंत येवून आपली नाव नोंदणी करणे बंधनकारक राहील.
९) स्पर्धेसाठीचा प्रवास व इतर खर्च आणि जबाबदारी संबंधित स्पर्धकाची राहील.
१०) प्रत्येक स्पर्धकास रू.१०० इतकी प्रवेश फी राहील.
११) आपल्या भाषणामध्ये प्रक्षोभक, विसंगत अशी विधाने असू नयेत याची संपूर्ण जबाबदारी त्या स्पर्धकावर राहील.
१२) परिक्षकांचा निर्णय आंतिम व बंधनकारक राहील.
१३) वेळोवेळी नियमांमध्ये व संयोजनामध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार संयोजन समितीस राहतील.
१४) स्पर्धेसंदर्भात सर्व अधिकार हे संयोजन समितीस राहतील.

बुक-पोस्ट

प्रति,
मा. ............................................
............................................
............................................
............................................



प्रवेश फॉर्म भरण्यासाठी
क्यू.आर.कोड स्कॅन करा

❊ प्रेषक ❊
**प्रो.(डॉ.) शिरीष लांडगे**
**प्राचार्य**
**जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालय**
ज्ञानेश्वरनगर, पो. भेंडे, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर

राहुल कुकाणा ९४२१५८३१९०

श्री मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्थेचे

# जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालय

ज्ञानेश्वरनगर, भेंडा बु.।।, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर
आयोजित



# लोकनेते मारूतरावजी घुले पाटील राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन

# वक्तृत्व स्पर्धा

(वर्ष - ३ रे)

**सन २०२६-२०२७**

दि.८ आणि ९ सप्टेंबर २०२६

❊ स्नेहांकित ❊
**प्रो.(डॉ.) शिरीष लांडगे**
प्राचार्य
आणि
सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी

दि.  /०८/२०२६

**प्रवेश अर्ज**

प्रति,
प्राचार्य,
जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालय,
ज्ञानेश्वरनगर, भेंडे बु. ता. नेवासा जि. अहिल्यानगर

महोदय,

आपल्या परिपत्रकानुसार श्री. लोकनेते मारुतरावजी घुले पाटील आंतरमहाविद्यालयीन राज्य स्तरीय वकृत्व स्पर्धेमध्ये आमच्या महाविद्यालयातील खालील विद्यार्थी भाग घेऊ इच्छित आहे. त्याची माहिती पाठवीत आहोत.

स्पर्धकाचे नाव. ..........................................................................................

वर्ग ..................          मोब. नं.............

स्पर्धेचा विषय ..............................................................................................

महाविद्यालयाचे नाव/पत्ता ..............................................................................

फोन. नं ............................     ईमेल .............................................

आम्ही आपल्या स्पर्धेची सर्व नियमावली वाचली असून आम्हास मान्य आहे.

प्राचार्य

सही

शिक्का